# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
कुलाबा, मुंबई-४०० ००५ दूरध्वनी: ०२२-२२१६३९६४/२२१६३९६५.
संकेत स्थळ: www.merc.gov.in ई-मेल: mercindia@merc.gov.in

जाहिरात क्र. १५/२०२०-२१

## जाहीर सूचना

### प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक ग्राहाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० वर अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (मविनिआ किंवा आयोग), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक ग्राहाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० चे प्रारुप तयार केले आहे. हे प्रस्तावित विनियम, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, मविनिआ (ग्राहक ग्राहाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २००६ ला अधिक्रमित करतील.

हे प्रारुप विनियम त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह **www.merc.gov.in** या संकेत स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात ठेवण्यात आले आहेत.

आयोग, वरील प्रारुप विनियमांवर लेखी अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती मागवित आहे. इच्छुक हितसंबंधितांनी त्याचे अभिप्राय, सूचना आणि/किंवा हरकती २ (१+१) प्रतींमध्ये, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई ४००००५ येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा ई-मेल : **cgrfmerc@merc.gov.in** द्वारा पाठवाव्यात.

बुधवार, दि. १७ जून, २०२० रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेले सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती प्रारुप विनियमांस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

सही/-
सचिव
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**ठिकाण** : मुंबई
**दिनांक** : १७ मे, २०२०